# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**Phone :** 0253-2539170,73

**Website :** www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल.,एलएल.बी.,पी.जी.डी.एच.आर.)
**प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Sriram kulkarni**
(B.S.L, LL,B., P.G.D.H.R)
**Offg.Director,Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/ ६८४ /२०२०

दिनांक : ०५/०६/२०२०

**"परिपत्रक क्र. ०१/२०२०"**

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

**विषय** : बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेबाबत...

**महोदय/ महोदया,**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व्यक्तीमत्व विकासासाठी विद्यापीठाच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून सतत प्रयत्न केले जात आहेत. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचा विद्यार्थी मुळातच हुशार समजला जातो. मात्र आर्थिक किंवा सामाजिक अडचणीमुळे त्याला उच्च शिक्षणात अडचणी येवू नयेत यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून विषयांकीत योजना विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेकरीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव/अर्ज **दि. १५/०९/२०२०** पर्यंत मागविण्यात येत आहे. सदर योजनांची माहिती या परीपत्रकासोबत जोडून पाठवित आहोत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासाला चालना देण्याकरीता महाविद्यालयबाहय उपक्रमांमध्ये सामाजिक कार्य घडवून आणणे व महाविद्यालय परिसरातील जनतेच्या सामाजिक जाणीवा सजग करुन जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने या सामाजिक जबाबदारीमध्ये विद्यापीठाचा थोडाफार हातभार असावा या हेतूने विद्यापीठाने सदर योजना सुरु केली आहे. त्यासाठी देण्यात येणारे अनुदानाकडे खर्चाची प्रतीपूर्ती म्हणून न पाहता सामाजिक बांधीलकी म्हणून पहावे असे अपेक्षित आहे. त्यामूळे प्राप्त अनुदानाचा विनियोग हा फक्त कार्यक्रम घेणे असा न ठेवता समाज जागृती व नवनिर्मितीच्या कामात आपला सहभाग असावा या उदात्त हेतूने या उपक्रमात भाग घ्यावा व सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या आधीन राहून योजना राबवावी.

**सद्यस्थितीत राज्यात कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग विचारात घेता शासनाने लॉकडाऊन पूर्णपणे मागे घेतल्यानंतर शासनाच्या सूचनांचे कटाक्षाने अनुपालन करुनच योजनेअंतर्गतचे कार्यक्रम राबवावेत. अशा कार्यक्रमांमध्ये मास्क वापरणे व सोशल डिस्टन्सींग ठेवणे याबाबतच्या अनुपालनाकडे आयोजकांनी कटाक्षाने लक्ष दयावे जेणेकरुन कोरोना विषाणूचा संसर्ग कुणालाही होण्याची परिस्थिती निर्माण होऊ नये. ऑनलाईन पध्दतीव्दारे योजनेअंतर्गतचे कार्यक्रम राबविण्याबाबत भर दयावा. तसेच सद्य परिस्थितीचा विचार करता योजनेअंतर्गतच्या कार्यक्रमांच्या विषयांमध्ये कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्याकरीता प्रबोधनपर कार्यक्रम प्राधान्याने राबविण्याची विनंती करण्यात येत आहे.**

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठी विद्यापीठाकडून रु. १०,०००/- अनुदान देण्यात येते. अनुदानाचे ऑडीट करण्यासाठी महाविद्यालयांना एकरकमी रु. ५००/- ऑडीट फी म्हणून देण्यात येईल. **बहि:शाल शिक्षण मंडळ योजना महाविद्यालयात राबविल्यानंतर १ महिन्याच्या आत प्रस्ताव समायोजनासाठी विद्यापीठास पाठविणे बंधनकारक राहील.** विद्यापीठाने दरवर्षी केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार अनुदान वाटप करण्यात येईल.

बहि:शाल शिक्षण मंडळ हा निव्वळ महाविद्यालयबाहय व्यक्तीमत्व विकासाचा उपक्रम न राहता समाज जागृती व नवनिर्माणाची चळवळ सुरु व्हावी या करीता आहे. सदर योजनेत सहभागी व्हावयाचे असल्यास योजनेचे अनुदान मिळण्यासाठी आपला प्रस्ताव नमुद केल्याप्रमाणे विहित नमुन्यात (सहपत्र "अ") विद्यापीठाकडे पाठवावा.

**ई-मेलद्वारे तसेच निर्धारित वेळेत प्राप्त न झालेले प्रस्ताव/अर्ज/कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाही. योजना संबंधीचे सर्व दस्ताऐवज विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.**

वर नमुद केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

धन्यवाद !

**प्र. संचालक**
**विद्यार्थी कल्याण**

**प्रत माहितीस्तव :** १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

**टिप :** वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2020-21 उपलब्ध आहे.

# - बहि:शाल शिक्षण मंडळ योजना नियमावली -

१. ज्या महाविद्यालयांचे प्रस्ताव विहित नमुन्यात (सहपत्र"अ") मुदतीत विद्यापीठास प्राप्त होतील अशा महाविद्यालयांना रु. १०,०००/- अनुदान वाटप करण्यात येईल. परंतू ज्या महाविद्यालयाने सदर योजनेचा यापूर्वी लाभ घेतला नसेल अशा महाविद्यालयांना प्रथम प्राधान्य देवून विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदीच्या कमाल मर्यादित अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

२. सदर बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेअंतर्गत व्याख्यानमाला, परिसंवाद चर्चासत्र किंवा शिबीर यांचे आयोजन करता येईल.

३. बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाचे ऑडीट करण्यासाठी महाविद्यालयांना एकरकमी रु. ५००/- ऑडीट फी म्हणून देण्यात येईल.

४. कार्यक्रम/उपक्रम अनिवासी स्वरुपाचे असावे व त्यांचे स्वरुप दरवर्षी बदलते असले पाहीजे.

५. चर्चासत्र/परिसंवाद/शिबीरात व्याख्यानमालेत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी विषयांची यादी खाली नमुद केलेली आहे. त्यासाठी तज्ञ व्याख्याता/मार्गदर्शकांना आमंत्रित करावे. **सदर यादी बाहेरच्या विषयांवर व्याख्यान/परिसंवाद/चर्चासत्र/शिबीर आयोजित करावयाचे असल्यास महाविद्यालयाच्या अधिष्ठात/प्राचार्य यांना निर्णय घेण्याचे अधिकार असतील.**

६. बहि:शाल योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी खर्चाच्या तपशिलानुसार देयके जोडावीत (छापील व सुस्पष्ट बिले).

७. बहि:शाल शिक्षण मंडळातर्फे आयोजित व्याख्यानमालेसाठी प्रस्तावित विषयांची यादी -

    १. महाविद्यालयात सिनीयर विद्यार्थी व नविन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रॅगिंग विषयी व्याख्यानमाला व समुपदेशन
    २. रॅगिंग विषयी शिक्षक व महाविद्यालय आवारातील इतर घटक उदा. वार्डन, कॅन्टीन स्टाफ, सुरक्षा रक्षक यांचेसाठी व्याख्यान माला
    ३. महिला सबलीकरण
    ४. स्त्री भ्रुणहत्या
    ५. व्यसनमुक्ती
    ६. संवाद कौशल्य विकास (Teacher – Student Communication Skills, Doctor-Patient relationship)
    ७. व्यक्तीमत्व विकास
    ८. आपत्ती व्यवस्थापन
    ९. तणाव व्यवस्थापन

८. बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठीचे अनुदान खर्च करावयाचा तपशील सोबत जोडला आहे. (सहपत्र "ब")

## बहि:शाल योजनेचे समायोजन करतांना महाविद्यालयांनी सोबत जोडावयाची कागदपत्रे

१. कार्यक्रमाचा अहवाल, फोटोग्राप्स्, शक्य असल्यास वृत्तपत्रांची कात्रणे इ.

२. व्याख्यात्यांना/वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची मूळ देयके (Original Bill )/व्हाऊचर्स.

३. कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष झालेल्या इतर प्रशासकीय खर्चाची मूळ देयके .

४. उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) लेखापरिक्षण करुन सोबत जोडावे.

५. जमाखर्च/हिशोब, सनदी लेखापालांकडून प्रमाणित करुन सोबत जोडावे.

६. रु. ५००/- ऑडीट फी ची मुळ (Original) पावती प्रस्तावासोबत जोडावी.

महाविद्यालयांनी बहि:शाल शिक्षण मंडळ या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आपला प्रस्ताव/अर्ज परिपत्रकान्वये विहित मुदतीत विद्यापीठास प्राप्त होईल अशा प्रकारे पाठवावा.

## खालील बाबींची नोंद घेण्यात यावी

**१. महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये महाविद्यालयाचे बॅकेत खाते असलेले नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोड, बॅकेची शाखा, बॅकेचा पुर्ण पत्ता नमुद करणे अनिवार्य आहे. जेणे करुन महाविद्यालयाच्या बॅक खात्यामध्ये आरटीजीएस करणे सोईस्कर होईल.**

२. नोंदणी झालेल्या केंद्राने वर्षातून किमान एक दिवसाची व्याख्यानमाला व एक दिवसाचे शिबीर/परिसंवाद/चर्चासत्र आयोजित करणे बंधनकारक राहील.

३. महाविद्यालयास यापेक्षा जास्त कार्यक्रम राबवावयाचे असल्यास त्यास मुभा राहील मात्र अतिरिक्त कार्यक्रमासाठी आलेल्या खर्चाची मान्यता मिळणार नाही. तसेच निर्धारित शिर्षपेक्षा/अनुदानापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची विद्यापीठ अदायगी करणार नाही.

४. मान्यवरांना/वक्त्यांना अनुदान रकमेतुन कोणत्याही स्वरुपाची भेटवस्तु देण्यात येऊ नये.

५. ज्या महाविद्यालयांकडे यापुर्वी दिलेल्या अनुदानाचे हिशोब प्रलंबित असतील अशा महाविद्यालयांनी हिशोबाचे तात्काळ समायोजन न केल्यास सदर योजनेचा लाभ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(सहपत्र "अ")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## बहि:शाल शिक्षण मंडळ योजना
## प्राचार्यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
**मा. संचालक विद्यार्थी कल्याण**
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

महोदय/महोदया,

आपल्या विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेत आम्ही सहभागी होण्यास इच्छूक असून कृपया या योजनेत सहभागी करुन घ्यावे ही नम्र विनंती.

सदर योजनेअंतर्गत आम्हाला अनुदान मंजुर झाल्यास योजनेच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आमची तयारी आहे. त्याचप्रमाणे योजनेसाठी आलेल्या खर्चाचा ताळेबंद, लेखा परिक्षण अहवाल व कार्यक्रमाचा वृतांत विद्यापीठास विहित मूदतीत पाठविण्यात येईल असे लिहून देतो.

**आपला**

**अधिष्ठाता/प्राचार्य**

**महाविद्यालयाचा शिक्का**

**संपर्क प्रतिनिधीचे**
**मो. नं. नाव व सही**

**महाविद्यालयाचे बँक खाते क्र -**

**आय.एफ.एस.सी कोड -**

**बँकेचे नाव -**

**बँक शाखेचा पत्ता -**

(सहपत्र "ब")

**बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या माध्यमातुन व्याख्यानमाला, परीसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीर यांच्या आयोजनासाठी विद्यापीठामार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुदान रक्कमेचा महाविद्यालयाने खर्च करावयाचा तपशिल**

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| अ) | **व्याख्यानमालेसाठी (१ दिवस)** | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१,००० X २) | रु. २,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवास खर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.२५०/- प्रतिवक्ता (२५० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु.१,०००/-X २) | रु.५००/- किंवा २,०००/- |
| | ग. प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.५००/- |
| | **प्रति व्याख्यान एकुण** | **रु.३,०००/- किंवा ४,५००/-** |
| ब) | **परीसंवाद / शिबीर / चर्चासत्र (२५ व्यक्तींसाठी १ दिवस)** | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१००० X २ वक्ते) | रु. २,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवासखर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.२५०/- प्रतिवक्ता (२५० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु. १००० X २ वक्ते) | रु.५००/- किंवा २,०००/- |
| | ग. सहभागींचा चहापान व भोजन खर्च | रु. १,०००/- |
| | घ. इतर प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.५००/- |
| क) | ऑडीट फी रु. ५००/- | रु.५००/- |
| | **एकुण** | **रु.४,५००/- किंवा ६,०००/-** |
| | **एकुण (अ + ब + क)** | **रु.७,५००/- किंवा रु.१०,५००/-** |